ISSN 2250-169X

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION
## RESEARCH REVIEW

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XI, Vol.- VI | Impact Factor 2.0048 (GRIFI) | June 2016 To Nov. 2016



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist. Nanded

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

Issue : XI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW

IMPACT FACTOR
2.0048

ISSN 2250-169X
June 2016 To Nov. 2016

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | A Study on Customer Satisfaction Towards E-Banking Services of ICICIBank in Chennai City | Sanket Sharad Pednekar | 1-15 |
| 2 | Mobile Agents for Parallel Processing | Sachin Sudhakar Rajmane | 16-20 |
| 3 | Analysis of Core Banking Solutions | Dr. D. G. Patil | 21-24 |
| 4 | Occurrence of Molluscan Species in Bori Reservoir, Naldurg, Dist. Osmanabad (MS) India | R. C. Sarvade, P. L. Sawant, Dr. M.G. Babare | 25-27 |
| 5 | खानदेशातील वन औषधी व त्यांचा उपयोग | डॉ. नानाजी दगा भामरे | 28-35 |
| 6 | भारतीय राज्यघटना व सामाजिक न्याय | डॉ. रत्नाकर बी. लक्षटे | 36-47 |
| 7 | शिक्षण आणि महिला सबलीकरण | शाहू गावडे | 48-54 |
| 8 | पारंपारिक लोककला - एक समाजशास्त्रीय अध्ययन | श्रीराम तुकाराम नरवडे | 55-59 |

DEGLOOR COLLEGE DEGLOOR
ADAT VYAPARI ... SOCIETY'S
Dist.Nanded

6

# भारतीय राज्यघटना व सामाजिक न्याय

**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Political Science

**प्रस्तावना :**

भारतासह संपूर्ण जगात अनेक शतकापासून सामाजिक न्यायाबाबतची चर्चा व विचारमंथन सुरु आहे. परंतू सर्वमान्य व सर्वसमावेशक असा सामाजिक न्यायाचा अर्थ कोणी एकाने सांगितला नाही. परंतु प्रत्येकाने त्यास पुरक तत्वांची मांडणी केली. भारतीयांनी सामाजिक न्यायाची मांडणी वर्ण व जातीव्यवस्था नष्ट करुन सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना प्रमाण मानुन केली. तसेच एक वर्ण व एका जातीअंतर्गतही अनेक विषमता असतात. त्या विषमता व त्यामार्फत होणारे शोषण संपल्याशिवाय सामाजिक न्याय स्थापन होत नाही, हे तितकेच सत्य आहे. तर पाश्चिमात्य आर्थिक समतेच्या दिशेने सामाजिक न्याय मांडतात. स्वातंत्र्यापासूनच सामाजिक न्याय हे भारतीय राज्यघटनेचे मुख्य ध्येय राहिले. राज्यघटना स्थापनेचा काळ व आताच्या काळात आमुलाग्र बदल झाला. प्रारंभीच्या काळात शासकीय सेवांना महत्व होते. खाजगी क्षेत्रांचा विस्तार अधिक झाला नव्हता. बऱ्याच प्रमाणात खाजगी क्षेत्राचे उद्योग आणि व्यवसाय विशिष्ट कुटुंबापुरतेच मर्यादित होते. त्यात कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वर्गाशिवाय इतर नौकऱ्या फार कमी होत्या. त्यामुळेच शासकीय कार्यालयात नौकऱ्यातील आरक्षण एका विशिष्ट मर्यादा व प्रतिष्ठेसाठी होते.

**संशोधनात्मक आराखडा :**

प्रस्तुत विषयावर शोध स्वरुपात मांडणी करताना सामाजिक न्यायाची स्थापना करणे हे भारतीय संविधानाचे ध्येय आहे या गृहितकास प्रमाण मानुन चिंतन करण्यात आले. मागील ७ दशकापासून सामाजिक न्यायाच्या स्थापनेला

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

प्रमाण मानुन राज्यकर्त्यांनी संविधानातील तरतुदींचा वापर कसा केला यावर प्रकाश टाकला. सामाजिक न्यायाच्या आड येणाऱ्या घटकांना संविधान कसे पुरुन उरते. त्याबाबतची चर्चा केली. या लेखास पुर्णत्वाच्या दिशेने घेवून जाताना ग्रंथालयीन व समीक्षणात्मक अभ्यासपध्दतीचा आधार घेतला. भारतीय संविधानातील कोणकोणत्या कलम व तरतूदीतून सामाजिक न्याय कोणकोणत्या वर्गासाठी व्यक्त होते हे जाणुन घेण्याइतपतचे उपयोगिता मुल्य प्रस्तुत लेखाचे आहे. सामाजिक न्याय हा या देशातील संविधान, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शासकीय योजना, घटनादुरुस्तीचा असा कसा आहे. यावरही प्रकाश टाकला.

देशांतर्गत व देशाबाहेरील सार्वत्रीक बदलाचा प्रभाव भारतीय समाज व राजकारणावर पडला. ज्यामुळे शासकीय नौकऱ्यांचे महत्व कमी होत गेले. परंतू ते सर्वसामान्य माणसासाठी किती महत्वाचे याचे चित्रीकरण अलीकडील काळातील नायक चित्रपटात करण्यात आले. शितयुध्द संपल्यानंतर भारतासह संपूर्ण जगात खाऊजा धोरणाचा अंगीकार सर्वत्र होवू लागला. खाऊजा धोरणाच्या अंगीकारामुळे भारतात १९९१ नंतर खाजगी क्षेत्राचा विस्तार तीव्र गतीने होत आहे. नवनवीन उद्योजकांना व्यावसायिक प्रगतीची संधी उपलब्ध झाली. उद्योग व व्यवसायांनी कुटूंबाची मर्यादा ओलांडून बाजारभिमुख स्वरुप धारण केले. खाजगी क्षेत्रात गुंतवणुक करुन अधिकाधिक नफा मिळविण्याच्या प्रवृत्तीचा विकास झाला तर दुसऱ्या बाजूने उद्योग, व्यवसाय याबाबतच्या शासकीय धोरण व भुमिकात बदल झाला. शासकीय उपक्रमातून सामाजिक दायित्वासोबतच इतरही अपेक्षा व्यक्त होवू लागल्या. त्यामुळे शासकीय विभागाचे कार्यक्रम खाजगी क्षेत्राच्या कार्यक्रमासमान बनू लागल्या. ज्याचे उदाहरण मोदी शासनाच्या स्वच्छता अभियान व योग दिवस साजरा करण्याच्या उपक्रमास दोन्ही स्तरातून मिळणाऱ्या उदंड प्रतिसादातून देता येते.

उच्च शिक्षण व माहिती तंत्रज्ञानाचा विकास व विस्तारासाठी नवनवीन उपाययोजना होत आहेत. कारण ते उद्योग व सेवा क्षेत्रात होणाऱ्या बदलाची मागणी होती. त्याच्या पुर्ततेसाठी ITI व IIM या सारख्या तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करण्यात आली. या सर्व संस्थामध्ये प्रवेशासाठी कमीत कमी जागा ठेवण्यात आल्या. प्रवेशपात्र परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्यासच प्रवेश देण्याचे धोरण घेण्यात आले. यातही कमकुवत वर्गाच्या मागासलेपणाचा विचार करून आरक्षणाचा आधार देण्यात आला. आरक्षणामुळे विविध क्षेत्रात होणाऱ्या फायद्याचा विचार करता नवनवीन गटाकडून आरक्षणाची मागणी होवू लागली. याचाच परिणाम म्हणून १९९० मध्ये इतर मागास वर्गाच्या (ओ.बी.सी.) आरक्षणास मान्यता देण्यात आली. तरीही आरक्षणाची मागणी करणाऱ्यांची संख्या कमी होत नाही. पटेल, जाट, धनगर, मराठा, मुस्लिम, लिंगायत या समूहाकडून वेगवेगळ्या पध्दतीने विविध राज्यात आरक्षणाची चळवळ राबवली जाते. पटेल, जाट आरक्षणास हिंसक तर मराठा, मुस्लीम, लिंगायत आरक्षणास शांततावादी स्वरुप प्राप्त होतो. शासन या सर्व मागण्या पुर्ण करता अधिक गंभीर आहे. कारण या सर्व प्रकारच्या मागण्यांना शेवट नाही. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास वर्ग या सर्वांना आरक्षण दिल्याने कोणास किती फायदा झाला ? यावर सर्वांचे समान मत नाही. ज्यांच्यावर याचा वाईट परिणाम झाला व होत आहे तो वर्ग त्याची

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR



समिक्षा करत आहे. ज्यांना त्याचा फायदा झाला तो समाधानी आहे. परंतू आरक्षणाच्या धोरणामुळे आम्ही सामाजिक न्यायाच्या दिशेने किती प्रमाणात जात आहोत ? यावर संशय व्यक्त केला जातो. त्यामुळेच या विषयावर अधिक विस्ताराने चर्चा होणे आवश्यक आहे. प्रसार माध्यमे, अभ्यासक, घटनातज्ञ, कायदेपंडीत यावर सदैव चिंतन करत आहेत.

भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय यांचे अतुट नाते आहे. तो एक अन्योन्य संबंध आहे. त्याच्या कारणाची मिमांसा करण्याआधी आपणास न्याय व सामाजिक न्याय म्हणजे नेमके काय ? याबाबतही विचार करावा लागेल. न्याय या संकल्पनेविषयीचे चिंतन प्लेटोपासून आहे. प्रत्येक विद्वतजण, धर्मग्रंथ आपापल्या परीने त्याची परिभाषा करतात. कारण ते एक शाश्वत मूल्य आहे. न्याय ही एक प्रक्रिया आहे. न्याय ही एक अनुभवजन्य संकलपना आहे. निःपक्षपातीपणे विभिन्न पक्षांसोबत वर्तन न्यायात अपेक्षित असते. न्याय सभ्य व आदर्श समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. न्याय जीवन जगण्याची पध्दती आहे. न्याय ही एक अवस्था आहे, ज्यात समाजातील सर्व सदस्याचा जीवन स्तर एकसारखा असतो. आत्मविश्वास, दया, आत्मनियंत्रण, संयम, सहनशीलता, नैतिकता व चारित्र्य इ. न्यायाची लक्षण आहेत. न्याय असेल तरच या सर्वांना अस्तित्व आहे. या सद्गुणांच्या आधारावरच व्यक्ति आपली प्रगती करतो.

समाजात ज्याठिकाणी न्याय नाही तेथे अन्याय असतोच. त्यामुळे न्यायासाठी इतर विशेषणाची आवश्यकता नसते. न्याय नाही तेथे सामाजिक न्याय शोधणे विसंगतीचे ठरेल. न्याय असेल तर सामाजिक न्याय हवाच. जर सामाजिक न्याय नसेल तर तेथे अन्यायच असेल. न्याय ही बहुआयामी संकल्पना आहे. ज्यात सामाजिक न्यायासोबतच आर्थिक, राजकीय व धार्मिक न्यायाचा समावेश होतो. जर आर्थिक न्याय नसेल तर सामाजिक न्याय अर्थहीन बनेल. जर आर्थिकदृष्ट्या नागरिकांत मागासलेपण असेल तर सामाजिकदृष्ट्या ते एक सारखे असू शकत नाहीत. सामाजिक न्यायात सामाजिक व आर्थिक या दोन्ही न्यायाचा समावेश होतो.

न्यायाचा बऱ्याच ठिकाणी दान असा अर्थ सांगण्यात आला. समाजातील संपन्न वर्गास वाटते की, इतर वर्गाने ही प्रगती करावी. यास पुर्तता किंवा वास्तवरुप मिळावे. म्हणून आपल्या उत्पन्नातील काही वाटा दुसऱ्यास देतात. ज्यास १२ व्या शतकात महात्मा बसवण्णांनी दासोह व २० व्या शतकात गांधींनी विश्वस्त संकल्पनेतून मांडले. न्यायाला कांही धर्मचिंतक व व्यक्ती धार्मिक कर्तव्यही मानतात. साधारणपणे सर्वधर्म कोणत्या ना कोणत्या पध्दतीने सामाजिक न्यायाची मांडणी करतात. यासाठीचे प्रमुख साधन म्हणून दान वापरतात. इस्लाम धर्मात जकात ही संकल्पना मांडली. ज्यात आपल्या संपत्तीतील कांही भाग गरीबांना देण्याचा आदेश देण्यात आला. पाचवेळा नमाज पडणे, रोजा करणे आणि हजप्रमाणेच जकात हे ही प्रत्येक मुस्लिमांचे कर्तव्य मानले. प्रारंभीच्या काळात अशा रक्कमेस कराच्या स्वरुपात घेण्याची तरतूद होती. परंतु ही व्यवस्था अधिक काळ टिकली नाही. त्यास व्यक्तीपरत्वे सोडुन दिले. परंतू त्यात अधिक प्रमाणात आपल्या धर्म अनुयाया पर्यंतच मर्यादित करण्यात आले. अशाचप्रकारे

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded



यहुदी धर्मात सदाखाचे तत्वज्ञान आहे. सदाखा म्हणजे सद्वर्तन, न्याय, आपल्या उत्पन्नाचा दहावा भाग दान द्यावा असे निर्देश आहेत. त्यास गरीब आणि धार्मिक कर्तव्य पूर्ण करण्यासाठी वापरात आणावे. ख्रिश्चन धर्मातही आपल्या उत्पन्नाचा दहावा भाग चर्च किंवा शासनास देण्याचे निर्देश आहेत. या धर्मग्रंथाने दानाचे महत्व वेगळ्याप्रकारे सांगितले. त्यांच्या मते, कयामतच्या दिवशी ईश्वर सर्वांना विचारतो की, तुम्ही सर्वांत शेवटच्या व्यक्तीसाठी काय केले. पोपच्या मते समाजाने सहकार्याच्या भावनेने काम करावे न की स्पर्धकाच्या हिंदू धर्म आपल्या तत्वज्ञानानूसार सर्व मुनष्यांना समान मानतो. दहा यम आणि दहा नियमांचे पालन करणे सर्व मनुष्यासाठी एक कर्तव्य आहे. या दहा नियमांत एक नियम कर्तव्य आहे. जर हिंदू धर्म मूलतः सर्वात एकच अस्तित्व मानत असेल. परंतू व्यवहारात त्यास जाती प्रधानच मानले जाते. विशेषतः १२ व्या शतकापासून त्या अधिक रुढ झाल्या. जन्म हा जातींचा आधार आहे. प्राचीन काळापासून जात आणि खेडी स्वायत्त आहेत. ते स्वतः आपले नियम बनवतात. त्यांचे पालन करतात. सहअस्तित्वाच्या भावनेने कार्य करतात. सामाजिक न्यायाच्या अभावाचे मुख्य कारण म्हणजे कांही जातींनी स्वतःस दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ मानल्यामुळे झाले. सामाजिक न्यायासाठी वारंवार महात्मा गौतम बुध्दापासून डॉ.बाबासाहेब आंबेउकरांपर्यंत अनेक महापुरुषांनी प्रयत्न केले. परंतु या प्रयत्नात बऱ्याच समाजसुधारकांनी आर्थिक न्यायास प्राधान्य दिले नाही. अपवाद फक्त महात्मा बसवेश्वर, कार्ल मार्क्स, डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

भारतीय संस्कृतीतील दान समाजातील वर्ण व जातीव्यवस्था यांसारख्या अनेक तत्वाचा प्रभाव राज्यघटनाकर्त्यावर होता. भारतीय समाजातील अनेक समाजविघातक तत्वांना नष्ट करुन लोकशाहीप्रधान नागरिक व समाज बांधणीस पुरक तत्वाचा उल्लेख राज्यघटनेत करण्यात आला. ज्याचा उल्लेख मुलभुत अधिकार, आरक्षण, मार्गदर्शक तत्वासारख्या तरतूदीतून जाणवतो. एका बाजूने भारतीय राज्यघटना सर्व नागरिक समान मानते तर दूसऱ्या बाजूने कांहीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक तरतूदी करुन समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे आश्वासन देते. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रतिष्ठा आणि संधीची समानता प्राप्त करण्यासाठी राज्यघटनेस अधिनियमित आणि स्विकृत करत आहोत. सर्वांना समान संधी व समान मानण्याचे वचन दिले. तसेच कमकुवत व मागासलेल्या वर्गाच्या संरक्षण व हितास प्राधान्य देवून इतरांच्या बरोबरीने आणण्याचेही वचन दिले.

भारतीय राज्यघटनेत त्याच्याशी संबंधित अनेक कलम आहेत. उदा : मार्गदर्शक तत्वातील कलम ४६, ज्यात राज्यामार्फत समाजातील कमकुवत वर्ग विशेषतः अनुसूचित जाती आणि जमातीसाठी विशेषत्वाने कार्य केले जाईल. ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती सुधारणा होईल. त्यांचे सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण केले जाईल. कलम ३९ (क) नुसार राज्यामार्फत ठरवले जाईल की, कायद्याच्या प्रक्रियेमार्फत सर्वांना समान संधीच्या आधारावर न्याय मिळेल. तसेच कोणताही नागरिक आर्थिक किंवा इतर कारणामुळे न्याय मिळवण्यापासून वंचित राहणार नाही. तसेच त्यास निःशुल्क कायदेशीर सहकार्य देण्याची तरतुद करण्याइतपत योजना व कायदेशीर

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



व्यवस्था बनवण्यात आली. ज्याचे प्रतीक अजमल अमीर कसाब खटला जाणवतो. अस्पृश्यतेविरुध्द समाजसुधारक आणि राजकीय नेतृत्वाकडून आरंभापासूनच प्रयत्न झाले. राज्यघटनेतील कलम १७ ने त्यास स्पष्ट केल्याची घोषणा केली. याशिवाय कलम १६ (४), २३, २५, २९ (२), ४६, २४४, ३३४, ३३५, ३३८ आणि ३३९ मध्येही कमकुवत वर्गासाठी विशेष तरतूद करण्यात आली. इतर मागास वर्गासाठी कलम ३४० मध्ये तरतूद आहे. ज्यानुसार शिक्षण आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी आयोगाची स्थापना करु. ज्यातून त्यांच्या स्थितीत सुधारणा होईल. या तरतूदी अंतर्गतच १९५५ ला काका कालेलकर व १९७९ ला बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग निर्माण झाले. यांनी १९८० ला आपला अहवाल दिला. ज्यावर १९९० ला कार्यवाही करण्यात आली. यातुन इतर मागासवर्गासाठी शासकीय सेवामध्ये २७% जागा राखीव ठेवल्या. याशिवाय गरजेनूसार व बदलत्या परिस्थितीनूसार तरतूदी करण्यात आल्या. अनेक कायदे बनवण्यात आले. जोपर्यंत सर्व समान प्रमाणात शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या येणार नाहीत तोपर्यंत राज्यघटनेतील समता व व्यक्ती स्वातंत्र्याला व्यावहारिकता नाही. सर्व राजकीय पक्ष सत्ता प्राप्त करण्यापूर्वी राज्यघटनेप्रती कटीबध्द असल्याचे आश्वासन देतात. सत्ताप्राप्तीवेळी तशी शपथ ही घेतात. परंतु त्यांच्या प्रत्येक विषयात राजकारणच अधिक जाणवते, पारदर्शक व इमानदारीचा अधिक अभाव आहे.

सामाजिक न्याय ही सर्वसमावेशक व सर्वव्यापी संकल्पना आहे. ज्यात आर्थिक न्यायाचा पदर अधिक महत्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीस त्याच्या क्षमतेनूसार सर्व गोष्टी मिळवण्याचा अधिकार व संधी सामाजिक न्यायात आहे. व्यक्तींकडून स्वतःहून दुसऱ्याप्रती सहकार्याची भावना निर्माण व्हावी हा ही सामाजिक न्यायाचा एक भाग आहे. सामाजिक न्याय म्हणजे फक्त संपत्तीचे समान वितरण नाही. त्याहीपुढे जावून मन आणि आत्म्याची स्वतंत्र अनुभूती म्हणजे पण सामाजिक न्याय नव्हे. परंतू आर्थिक न्यायाशिवाय सामाजिक न्यायाला व्यावहारिकता नाही हे ही तितकेच खरे आहे. आर्थिक न्याय ही बहुआयामी संकल्पना आहे. ज्यात योगदान, समान वितरण आणि अनुकुलता यास महत्व आहे. जर वरील तीनपैकी एकही बाब नसेल तर आर्थिक न्यायाची अवस्था दात पडलेल्या कमकुवत सिंहासारखी किंवा एक पाय नसलेल्या खुर्चीसारखी होती. योगदान म्हणजे देशाच्या आर्थिक स्थितीत समाजातील सर्वच घटकांचे समप्रमाणात योगदान असते. त्यात संधीच्या समानतेला प्राधान्य आहे. परंतु प्रतिष्ठा व स्थितीच्या समतेला नाही. या सिध्दांतात एकाधिकार, विशेषाधिकार व सामाजिक रुढी, परंपरा, बंधने हे अडसर नसावेत. समान वितरणात उत्पादनात सर्वांना समान अधिकार असावा. परंतू तो श्रम, भांडवल व उद्योगशील त्यानुसार मिळावा. यात बाजाराचे ही योगदान महत्वाचे आहे. शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप नसावा, संपत्ती कमावणे, खर्च करणे व जमा करण्याबाबत शासनाचा हस्तक्षेप नसावा. परंतु राज्यघटनेनूसारच अशा नियम व कायद्याची निर्मिती करावी लागते. ज्यामुळे विषमतेची भावना व्यक्तीला निरुत्साही करणार नाही. अनुकूलतेचे तत्व पहिल्या दोन तत्वाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणीला सोडवण्यासाठी आहे. याच्या आधारे एकाधिकारशाहीस नष्ट करणारे आणि संपत्तीच्या साह्याने इतरांना अधिकारापासून वंचित करण्याचा विरुध्द नियम बनवले जातात. अनुकूलता म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे कार्य संपूर्ण

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist. Nanded



समाजासाठी हितकारक असावे. ज्यामुळे कोणाच्याही अधिकारात हस्तक्षेप होणार नाही. तर कांही अभ्यासक व अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे की, प्रगतीसाठी थोड्या प्रमाणात विषमता आवश्यक आहे. देशांतर्गत जर संपत्ती वाढत असेल तर त्यात सर्वांना वाटा मिळेल. जर उपभोग वाढत असेल तर प्रत्येकास क्षमतेनूसार सहभाग मिळेल. तंत्रज्ञानाच्या साह्याने येणाऱ्या काळात अनेक बदल होतील.

वर्तमान युगात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे बाजार व अर्थव्यवस्थेवर वर्चस्व निर्माण झाले. एका क्षणांत करोडो रुपये एका देशातून दुसऱ्या देशात हस्तांतरीत केले जातात. त्यांच्याकडून अनेक देशांच्या अर्थव्यवस्था नियंत्रित होत आहेत. वर्तमान जागतिक बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेला दुसरा पर्याय नाही. यामध्ये सत्ता व संपत्तीच्या केंद्रीकरणास ऐकता येते. आपल्या कंपनीत काम करणाऱ्या नौकरदार वर्गाला शेअरमध्ये भागीदारी देण्याचा मार्ग अवलंबण्यात आला. इतर देशांच्या तुलनेत भारतात याची अधिक जाणीव होत नाही. त्यास बोनसच्या स्वरुपात दिले जाते. परंतु अलिकडे हे बोनसही बंद झाले. आमच्या देशातील गुंतवणुकीचे नियमच या प्रकारच्या योगदानास निरुत्साहीत करतात. व्यक्ती सामाजिक दृष्ट्या परस्परांशी संबंधित असतात. ज्यामुळे सामाजिक न्याय व समान संधीचा समावेश होईल. भांडवलवादाला नष्ट करता येणार नाही, परंतु सामाजिक विकास व कल्याणाच्या योजना व तत्वांना लागू करुन त्याच्या प्रभावास दूर करता येते. ज्याचा एक भाग म्हणून मानवाच्या शाश्वत विकास, सामाजिक स्त्रोतात, पर्यावरण सुरक्षेत व भांडवल समानतेची निर्मिती करता येते.

भारतास स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली तरी आम्हास सामाजिक न्यायास पूरक तत्वाच्या अंमलबजावणीसाठी अनेक तरतूदी कराव्या लागत आहेत. काही जणांना प्रश्न निर्माण होईल की हे चुकीचे आहे. परंतू एका बाजूने जर विचार केला तर आजही सामाजिक न्यायासाठी कमकुवत वर्गाच्या कल्याणार्थ अनेक योजनांची नितांत गरज आहे. कारण समाजातील कमकुवत वर्गाची स्थिती अन्य वर्गाच्या समान नाही. समता निर्माण होण्यासाठी जे उपाय करण्यात आले त्याचा कांही फायदा झाला नाही तर त्यात बदल करणे गरजेचे आहे. तसेच मागील ७० वर्षांत केलेले उपाय यशस्वी का झाले नाहीत ? यावरही संशोधन आवश्यक आहे. स्वातंत्र्यापासून ते आतापर्यंत देशात चौथी पिढी आहे. जी अजून या सर्व सुविधा व योजनांचा हित व अहित याबाबत चिंतन करण्यास सक्षम नाही. परंतू त्याची समिक्षा करताना मात्र ती या सर्व ऐतिहासिक संदर्भांना बदलत्या परिवेशात मांडेल.

अनुसूचित जाती व जमातीचे लोक हजारो वर्षापासून मागासलेपणाचे जीवन जगत आहेत. दलित, शोषित व कमकुवत स्थितीत त्यांच्या जगण्याचे वर्णन अभ्यासकाने केले. या वर्णनातून त्यांनी त्यांच्या सामाजिक व जगण्याच्या अवस्थेचे व्यवच्छेदक व विदारक चित्र जगासमोर मांडले. या वर्गाला देशाच्या व समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे आवश्यक असल्याची मानवीय मांडणी केली. ज्याचा समावेश संविधानात करण्यात आला. परंतू संविधानात समावेश करुन हजारो वर्षांपासून लोकांच्या मनात घर करुन बसलेल्या सवर्ण व मागास लोकांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विषमता जाणार नाही हे ही तितकेच सत्य. लोकशाहीच्या देशात निम्न जातीचे असल्यामुळे लोकप्रतिनिधींना

Issue : XI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 2.0048
ISSN 2250-169X
June 2016 To Nov. 2016 

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

पाणी पिण्यास दिले जात नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना समान दर्जा मिळत नाही. आरक्षणाचे तत्व लागु असूनही आरक्षीत पद भरत नसल्याचा अनुभव आहे. त्यासाठी शासनास विशेष आदेश काढावे लागतात. अपंगा बाबतही हिच अवस्था आहे. उच्च व चतुर्थ श्रेणीच्या पदाबाबतचा सारखाच अनुभव आहे. प्रारंभी अशी तरतूद होते की, अनुसूचित जाती व जमातीचे योग्य व्यक्ती मिळाले नाहीत. तर सवर्ण जातीच्या लोकांना घ्यावे त्यामुळे एस.सी. व एस.टी. जातीचे लोक येतच नसत यामुळे अशी तरतूद करावी लागली की, एस.सी. व एस.टी.च्या रिकाम्या जागेला भरु नये. जोपर्यंत त्या प्रवर्गाचा व्यक्ती मिळत नाही. अशाच प्रकारे उच्च अधिकाऱ्याकडून योग्य प्रतिसाद व रिमार्क न मिळाल्यामुळे बढती मिळण्याची संधी मिळत नसत. त्यासाठी पण आरक्षण करावे लागले. सेवेत घेणारे सर्वच समान नसतात. त्यांच्यातही भेदभाव केलाच जातो. सवर्ण जातीच्या मुलांसोबत दलित वर्गाचा मुलगा आनंदी जगु शकत नाही. कारण परस्पराविषयी मनात ज्या भावना निर्माण झाल्या त्या सहजासहजी नष्ट करता येणार नाही. त्यास वेळ लागेल. अनादी वर्षापासूनचा डाग एका धुण्यातच धुतला जाईल असा कांही लोकांचा विचार आहे. परंतू हा दाग एकाच धुण्यात जाण्याचा सर्फएक्सेल आणखीन तयार झाला नाही. परंतु निश्चितच माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, रोजगार, व्यवसाय यांतील वाढत्या परस्पर सहकार्य व गरजेतून ही बंधने आपोआपच गळुन पडतील.

सामाजिक न्यायाच्या आड येणाऱ्या जातीव्यवस्था व अस्पृश्यतेच्या दागाला स्वच्छ करणारे अनेक साबणे मागील ७० वर्षांत व त्याहीपूर्वी वापरण्यात आले. मागास व दलित वर्गातील व्यक्तींची अवस्थाही अनुसूचित जाती व जमातीप्रमाणेच आहे. आरक्षणामुळे प्रतिभेला संधी मिळत नाही असे म्हणणाऱ्यांनी हे विसरु नये की, त्यांच्या पूर्वजांनी अनेक पिढ्यापर्यंत त्याचा अयोग्य वापर करुन हित साध्य केले. आता त्याच्या प्रायश्चित्ताची वेळ आहे. परंतु त्यासाठी फक्त शासकीय नौकऱ्याच एक मार्ग नाही. व्यापार आणि खाजगी संस्थात आरक्षण नाही. यात अनुसूचित जाती व जमातीचे लोक येवू शकत नाहीत. कारण समाजात आजही त्यांच्याकडून सेवा घेण्यास अनेक सामाजिक व मानसिक अडसर आहेत. परंतु सवर्णासाठी कांही अडचणी नाहीत. महिलांच्या बाबतीत ही हाच संदर्भ लागू पडतो. कारण त्यांना अतिशुद्र समजले जाते. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रिनी कोणती भूमिका बजावावी हे स्त्री ठरवत नाही तर पुरुष ठरवतो. २१ व्या शतकात भारतात बऱ्याच कुटूंबात स्त्रीप्रती भेदभाव केला जातो. ज्याचे नाटकीय चित्रीकरण सी.आय.डी., दस्तक, क्राईम पेट्रोल अशा कार्यक्रमातून जनतेला दाखवले जाते. स्त्रिप्रधान नाटकातून स्त्री या प्रतीचे समाज व कुटूंब मनही अभिव्यक्त होते. शिक्षण, नौकरी, खेळ किंवा इतर कोणत्याही कामानिमित्त मुलगी घराबाहेर गेली तर ती घरी सुखरुप येईपर्यंत चिंता व काळजी. परंतु मुलगा वरील कामानिमित्य किंवा त्याशिवाय पार्टीला गेला तरी त्याची चिंता वाहताना कुटूंब मंडळी जाणवत नाहीत. मुलांबाबत चिंता करणारा बाप व आई कमी प्रमाणाच आहेत. समाजात हुंडा पध्दती प्रथा आहे. आपली पत्नी सरपंच किंवा ग्रामपंचायत समिती सदस्य झाल्याचे अभिमानाने सांगणारे कुटूंबियाला अधिकार देताना मात्र स्वतः पुढे येतात. आपल्या कुटूंबातील स्त्रिने पडदा पध्दतीचे पालन करावे. स्त्री ही कुटूंबाची संपत्ती व प्रतिष्ठेचे साधन आहे. सामाजिक व राजकीय कार्यक्रमात

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

समाजासमोर अभिव्यक्त होवू नये. संविधानाने दिलेले सामाजिक संचाराचे स्वातंत्र्य व अधिकार तिला नाहीच. इतर कुटूंबातील महिला सामाजिक व राजकीय कार्यक्रमात येत नाहीत म्हणून आपल्या बायकोला न पाठवणारे पुरुष आहेत.

स्त्रीसोबतच समाजाने लहान बालकांच्या हक्कांकडे दूर्लक्ष केले. ज्या कुटूंबात सदस्य संख्या अधिक आहे. उत्पन्नाचे स्त्रोत नाहीत. त्या कुटूंबात मुलांना बालवयातच उत्पन्न कमावण्यासाठी कामावर लावले जाते. यातही मुलींना प्रथम कामाला पाठवले जाते. अशीच अवस्था देशातील ३ करोड अपंगाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक अधिकार, मानवी हक्क व सामाजिक न्यायाची आहे. शासकीय सेवेतील त्यांच्या भर्ती बाबत उदासीनता दाखवली जाते. न्यायालय वारंवार वरील सर्व घटकांच्या सामाजिक न्यायाबाबत आवाज उठवतो. राज्यकर्त्याला त्याची आठवण करुन देते.

वरील सर्वांना सामाजिक न्याय मिळावा अशी वल्गना राज्यघटना करते. त्याचा आधार घेवून शासनकर्त्यांनी अनेक कायदे व योजना बनवल्या. त्या योजनाबाबत माहिती घ्यावी लागेल. १९५५ ला अस्पृश्यता विरोधी कायदा बनवला. त्यात १९७६ ला दुरुस्ती करुन नागरी अधिकार संरक्षण कायद्याचे नाव दिले. १९८९ ला अनुसूचित जाती व जमाती अत्याचार निवारण कायदा पास केला. या कायद्यात अस्पृश्यता, भेदभाव व दुजेपणाच्या वर्तणास गंभीर गुन्हा मानले. १९७६ ला वेठबिगारी समाप्तीचा कायदा बनवला. ज्याचा अधिकाधिक फायदा अनुसूचित जाती व जमातीला मिळला. या सर्व तरतूदी सामाजिक स्थितीत सुधारणा करण्याचे एक नाटक आहे. जे आम जनतेला राज्यघटनेनूसार कारभार होतो हे दाखवते. व्यवहारात लोकसभा, विधानसभेत अनुसूचित जाती व जमातींना आरक्षणाची तरतूद महत्वाची होती. यामुळे त्यांना राजकीय सत्ता मिळणे सोपे होते. राजकीय जमात बनता येते. ज्याचा प्रारंभ १९३२ च्या पुणे करारापासून झाला. ज्यात मतदारसंघाच्या आरक्षणाची चर्चा झाली. ब्रिटीशांच्या मते मुस्लिम समाज बांधवाप्रमाणेच अनुसूचित जातीसाठी वेगळी निवडणूक व्यवस्था असावी. मतदार यादी एकच ठेवून निवडणूकीसाठी मतदारसंघ आरक्षित करण्यात आले. परंतू राज्यघटना बनवताना त्यात अनुसूचित जमातींचा ही समावेश करण्यात आला. अशीच व्यवस्था महिलांसाठी असावी हा प्रस्ताव दशकांपासून संसदेत धुळखात आहे. पुरुषी व जातीय राजकारणी अभिजनवाद्यांकडून ते वास्तवतेत येत नाही.

राज्यघटनेने आरक्षणाच्या तत्वाची अंमलबजावणी करण्याची तरतूद त्यांचे संभाव्य धोके व फायदे लक्षात घेवून १० वर्षाची मुदत दिली होती. परंतू आरक्षण सामाजिक न्यायाऐवजी राजकारणाची व सत्तेची गुरुकिल्ली बनले. म्हणून त्याची मुदत ७० वर्षापर्यंत टिकून आहे. आजच्या राजकारणाचा तो स्थाई घटक बनला. जोपर्यंत समाजातील प्रत्येक घटकांची परस्परा बाबतची वेगळेपणाची भावना संपत नाही तोपर्यंत आरक्षण समाप्त होत नाही. तसेच वर्तमान नवभांडवली अर्थव्यवस्थेचा रेटा असाच वाढला तर कदाचित आरक्षण गळुन पडेल अथवा नवभांडवली व्यवस्था कामगार वर्गाच्या बंडाला मोडून काढण्यासाठी इतर सुविधा व साधनांसोबत आरक्षणाच्या तत्वाचा वापर काही अटी लादून करु शकते. याशिवाय आर्थिक निकषावर त्याचे निश्चितीकरण होईल.

Issue : XI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 2.0048
ISSN 2250-169X
June 2016 To Nov. 2016
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाले. तरीही सामाजिक न्यायापासून वंचित असणाऱ्या घटकांची यादी हनुमानाच्या शेपटीप्रमाणे लांबत जाणारी आहे. या यादीत एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., महिला, अपंग, बालकासोबत आदिवासी व वृध्दांचाही समावेश होतो. आदिवासी समुहाचे अनेक कारणातून शोषण करणारी यंत्रणा आहे. अंधश्रध्दा, अनारोग्य, भुकबळी, उपजीवीकेच्या साधनांचा अभाव, रानटी जीवनमान व त्यात असणारी त्याची श्रध्दा व विश्वास ई. वर्तमान भांडवली व बाजारी व्यवस्थेपासूनची अनभिज्ञता, स्वत:ची उपजिवीका भागवण्यास तोकडे पडणाऱ्या साधनांमुळे आदिवास्यांना कर्ज काढावे लागते. त्या कर्जापोटी त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज वसुली होते. ज्यामुळे आदिवासी कधीच कर्जमुक्त होत नसत. या आदिवास्यांच्या समस्येला सोडवण्याचे काम बाबा आमटे, प्रकाश आमटे, साधना आमटे या कुटूंबांनी केले. शासनामार्फत कर्ज उचलुन कायदा बनवला. तसेच आदिवासी लोकांच्या मालकीच्या जमिनी नाममात्र किंमत देवून विकत घेण्याचे षडयंत्र त्यांच्या जगण्याला नष्ट करणारे ठरले. ज्याचे जाचक परिणाम झाले. त्यामुळे राज्य शासनाने राजस्व संहितेत तरतूद केली की, आदिवासी लोकांची जमीन जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय बिगर आदिवासीने खरेदी करु नये. तसेच काही राज्यात अशी ही तरतूद आहे की, जर एखादी जमीन पूर्वी आदिवासीची असेल परंतू आता ती बिगर आदिवाशाकडे आहे. तर त्याबाबत विक्रेत्याला माहिती द्यावी, प्रमाणित करावे की या जमिनीस कायदेशीर मार्गाने प्राप्त केले. अन्यथा ती जमीन पुन्हा आदिवासी किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्यांना परत करावी.

परंपरा व निसर्गाने अनुसूचित जमातीच्या लोकांना जंगलात कांही अधिकार प्राप्त होते. तेच खरे जंगलांचे मालक होते. वाढत्या शहरीकरण व विकास प्रक्रियेत रस्ते, मोठे पुल बनवणे व खनिज संपत्तीच्या साठ्यामुळे बरेच जंगले अधिग्रहण करण्यात आले. ज्यामुळे अनुसूचित जमातीचे लोक विस्थापित झाले. परंतू त्या अवस्थेत त्यांना जगण्यासाठी लागणाऱ्या उपजीविकेसाठी फार भटकंती करावी लागत. शासनाकडून दखल न घेणे, त्यांना जगण्यापूरते धन उपलब्ध करुन न देणे. यामुळे त्यांच्यात असंतोषाची भावना अधिक प्रबळ बनली. मागील दोन दशकापासून त्याकडे अधिक लक्ष दिले जात आहे. २००६ च्या अंदाजपत्रकात The Scheduled Tribes & Other Traditional Forest Dwellers पास करण्यात आले. ज्यातून बरेच अधिकार आदिवाशांना परत केंले. इतर मागास वर्गासाठी आरक्षणाच्या २७% सोबत शिष्यवृत्तीच्या योजनेला मान्यता दिली. कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय सर्व दलित व मागास वर्गासाठी आहे. महिलांना सामाजिक न्याय मिळावा म्हणून संविधानाचा आधार घेवून अनेक कायदे बनवण्यात आले. हुंडा पध्दती, शारिरीक व आर्थिक शोषणापासून संरक्षण म्हणून कौटुंबिक हिंसाचार कायदा - २००५ बनवण्यात आला. ऑनर किलींगसह अनेक इतर प्रकरणात महिलांच्या संरक्षण व हितास प्राधान्य देणाऱ्या कायद्याची निर्मिती झाली. आदिवासी व महिलांसोबत लहान बालकांच्या अधिकारास समाजाने मान्यता द्यावी. त्यांना जगण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा धागा समजावा हा विचार करून युतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक योजना राबविल्या आश्वासने व घोषणा दिल्या. गरीबी, रोग, कुपोषण व भुकबळी व बालमजूरीपासून राबवण्यासाठी संकल्प

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

करण्यात आला. या जगातील प्रत्येक बालकांच्या भौतिक, मानसिक, अध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक विकासासाठी योग्य जीवनस्तर मिळण्याच्या सर्व अधिकारास मान्यता देण्यात आली. लहान बालकांना कोणत्याही जीवघेण्या ठिकाणी कामावर ठेवू नये. १४ वर्षांखालील मुलाकडून काम करून घेणे कायद्याने बालमजूरीचा गुन्हा ठरवला. २००९ सालापासून लहान मुलांच्या शिक्षणच्या अधिकारास मान्यता देण्यात आली.

अनुसूचित जाती व जमातीच्या प्रगतीसाठी अनेक योजना बनवण्यात आल्या. परंतू त्या सर्वांचा पुरेपूर वापर झाला नाही. कारण की या योजनांच्या क्रियान्वयनासाठीची वाढती मागणी ती पूर्ण करण्यासाठी नसलेला निधी बऱ्याच वेळा या कामावरील निधी दूसऱ्या योजनांकडे वळवला जातो. त्यासाठी केंद्र शासन व निती आयोगाकून आदिवासी उपयोजनांची तरतूद करण्यात आली. प्रत्येक योजनेत आदिवासींच्या विकासासाठी दर्शवलेली रक्कम शिल्लक रक्कमेपासून वेगळी दाखवली जाते. या रक्कमेला इतर गैर आदिवासी योजनेत हस्तांतरीत करु नये. अशाच प्रकारच्या तरतूदींची गरज अनुसूचित जातीसाठी होणे शक्य नाही. कारण की अनुसुचित जातीचे सदस्य कोणत्या एक क्षेत्रात मर्यादीत नाही. परंतू त्यांच्यासाठी व्यक्तिगत स्तरावरच्या अनेक योजना बनवण्यात आल्या. ग्रामविकासासाठी विशेष घटक योजना बनवली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिष्यवृत्तीचा प्रारंभ केला. जेंवढे विद्यार्थी असतील त्यांना शिक्षणापासून संशोधनापर्यंत शिष्यवृत्ती देण्यात आली.

बऱ्याच घटक राज्यांनी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व मोफत पुस्तके देण्याचा उपाय राबवला. शिक्षणासोबतच प्रशिक्षण व उत्पादन केंद्र आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचे संचलन होवू लागले. कर्ज देण्यासाठी आदिवासी अर्थ व विकास निगम स्थापन करण्यात आला. अशाप्रकारे राज्य सहकारी अनुसूचित जाती अर्थ व विकास निगम स्थापन झाला. अनुसूचित जातीसाठी बनवलेल्या अर्थनिगमने वर्ष २००६-०७ मध्ये ७६,००० लोकांना १६९ करोड रुपयांचे रक्कम दिली. स्पर्धा परिक्षेच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. महिलांसाठी डाकरा योजनेअंतर्गत स्त्रियांच्या समूहांना व्यापारासाठी कर्ज दिले जाते. ग्राम योजनेअंतर्गत कार्यात्मक रक्कम देण्याची व्यवस्था आहे. नारी निकेतन, सेवास्त महिला गृह, आयुष्यमती, वात्सल्य योजनेअंतर्गत सहकार्य देण्यासोबतच महिला जागृती शिबीराचे आयोजन केले जाते. राष्ट्रीय महिला कोषामार्फत २०१०-२०११ पर्यंत १४६४ अशासकीय संस्थाच्या साह्याने महिलांना कर्ज वाटप केले जाते. बालकांच्या विकास व कल्याणासाठी अनेक योजना चालवल्या जातात. ज्यात पोषक आहार, लसीकरण ई. तसेच मातृ कुटीर योजनाही सुरु केली. याशिवाय अॅट्रासिटी सारख्या कायद्यातूनही सामाजिक न्याय साध्य केला जातो. परंतू या कायद्याचा चुकीचा होणारा वापर लक्षात घेवून मनसेचे पक्षाध्यक्ष राज ठाकरेंनी जूलै २०१६ ला कोपर्डीस घडलेल्या सामुहिक बलात्काराच्या पार्श्वभुमीवर हा कायदाच रद्द करावा अशी जाहिर मागणी प्रसारमाध्यमांसमोर बोलताना व्यक्त केली तर त्या कायद्याबद्दल करावा यासाठी महाराष्ट्रात मराठा जातीचे विशाल मोर्चे निघत आहेत. जे २०१६ च्या महाराष्ट्र राजकारणाचे प्रमुख घटना व लक्षण ठरेल. या निमित्ताने महाराष्ट्रात सर्वच स्तरावर अॅट्रासिटीबाबत चर्चा सुरु झाली.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded



सर्वसाधारणपणे वरील सर्व योजना व प्रयत्नांचा बोजवारा असूनही सामाजिक न्यायाबाबत ज्या स्थितीची अपेक्षा होती ती जाणवत नाही. अनुसूचित जाती व जमातीतील एकाच वर्गाकडे संविधानातून सामाजिक न्यायाच्या दिशेने झालेले अधिकांश प्रयत्न झुकत गेले. तर इतर वर्ग आणखीनही दुर्लक्षित आहेत. तसेच यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत नाही. त्यामुळे शासकीय व सामाजिक स्तरावर होणारी चूक कुठे होत आहे. वर्तमान नवभांडवली वातावरणात सामाजिक व आर्थिक न्यायाच्या विषयास व्यावहारिक रुप कसे देता येईल. सर्वांत प्रथम प्रत्येकात मानसिक बदल अपेक्षित आहे. विशिष्ट ध्येय असणाऱ्या योजना ठरवून कोणताही भेदभाव न करता सर्व वर्गाच्या प्रगतीसाठी कार्य करावे लागेल. खाजगी क्षेत्राचा विस्तार वाढत आहे. वर्तमान उदारमतवादी युगात जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रभावाने त्यास रोखता येणार नाही. आरक्षणासोबत समान वितरणाचा विचार करावा अन्यथा आरक्षणाचा अति आग्रह आरक्षणाच्या नाशास कारणीभूत होईल. वर्तमानात एका बाजूने आरक्षणास विरोध करणारा विचार व नवशिक्षिताचा तरुण वर्ग पुढे येत आहे. आरक्षणाच्या धोरणाची व्यावहारिकता तपासता ती विचार करण्यास लावणारी आहे. अलिकडेच गुजरात उच्च न्यायालयाने खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित जातीसमुहांना नौकरीच्या जागेवर अर्ज करता येणार नाही असा निकाल दिला. तर दूसऱ्या बाजूने समाज व शासन स्तरावर समान नागरी कायद्याचा विचार बळावतो. आरक्षणरुपी कवचकुंडले धारण करून शासन व्यवस्थेला वेठीस धरणारा एक समूह उदयास येत आहे. या समूहास लोकशाही प्रक्रियेत कशा पध्दतीने समाविष्ट करून घेता येईल ते ही सामाजिक न्यायाची बुजराखून व संविधानातील धर्मनिरपेक्षता, सार्वभौमत्व, राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्याची महत्ता त्यांच्या पचनी पाडून आरक्षण हा भारतीय राज्यघटनेने मानलेला सामाजिक न्यायाचा एक पर्याय आहे. तो गरीबी हटावचा कार्यक्रम नाही. वर्तमानात आरक्षणाबाबतची शासकीय नेते, राजकारणी, राजकीय पक्ष व जनतेची मानसिकता पाहता ते संपवता येणार नाही. परंतु त्याच्या निकषाबाबत विचार करता येतो. आरक्षणामुळे ज्या वर्गाला फायदा झाला त्या वर्गाने आपल्या समाजास पुढे नेण्याचा प्रयत्न केला नाही. उलट त्याचे फायदे आपल्या पर्यंतच राखून ठेवले. सामाजिक न्यायासाठी लवकरात लवकर आर्थिक न्यायाची प्रस्थापना गरजेची आहे. वर्तमान वैश्विक व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे चित्र पाहता हे शक्य नसल्याचे जाणवते. परंतु या अर्थव्यवस्थेच्या मध्य व शिर्षस्थानी काम करणाऱ्या गट व समुहांनी तयार होवून पुर्ण भूमिकेने कार्य केले तर ते शक्य वाटते. यासाठी साधारणपणे शिक्षण व संपत्तीचे समान वितरण हे दोन पर्याय योग्य वाटतात. पहिल्या पर्यायाला सर्वच स्तरातून पसंती मिळते. आर.टी.ई. पास करण्यात आला. सर्व शिक्षा अभियानातून त्यास व्यावहारिकता मिळाली. परंतु संपत्तीच्या समान वितरणाचा विषय हा भेदभावाचा व घटनात्मक तरतूदींना ठेच देणारा ठरेल, जरी तो सामाजिक न्यायासाठी क्रमप्राप्त असला तरी तो अव्यवहार्य आहे. त्याजागी मागासवर्गांना कमी व्याजाने व दिर्घ मुदतीच्या परतफेडी तत्वावर कर्ज द्यावे. शिक्षण आणि कर्ज या मार्गाचा विचार करताना आम्ही प्रथम शिक्षणाचा मार्ग अनुसरला. परंतू तो ज्ञान निर्मिती व शहाणपणा विकसित करण्याच्या दिशेने जात नाही. तरी आर्थिक शिक्षण व समाज नसणाऱ्या वर्गास कमी व्याजाने व शुल्लक अटींच्या अधीन राहून कर्ज दिले. सर्व शिक्षा अभियानात

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



मुलांच्या प्रवेशाला प्राधान्य दिले. शिक्षणाऐवजी तसेच शाळेतील पायाभुत सेवा सुविधा वाढवल्या. परंतू शिक्षणाचा स्तर विकसित करण्यातील हे मार्ग कुचकामी व निकामी ठरले. राज्यघटना या देशातील प्रत्येक व्यक्तीला योग्य व सक्षम बनवण्याचे ध्येय बाळगते. प्रत्येक नागरिकाने अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याइतपत सक्षम बनावे. १९५० पासून प्राथमिक शिक्षणाला अनिवार्य / सक्तीचे केले. राज्यघटनेने हे प्रारंभापासून सांगितले. परंतू मार्गदर्शक तत्वात खरंच जर राज्यघटनेला अपेक्षित सामाजिक न्याय समाजात रुजवायचा असेल तर प्रत्येकात क्षमता विकसित व्हावी. कर्तव्याप्रतीची दक्षता रुजावी व नंतर खरच आवश्यकता योग्यता असेल तर कर्ज मिळते म्हणून घ्यावे असे नको. याशिवाय समाजातील सर्वच क्षेत्रात समता रुजावी ती रुजवण्याचा लोकशाही हा योग्य मार्ग आहे. परंतू तो दीर्घ पल्याचा आहे. भारताचा विचार करता येथे अतिलोकशाही रुजताना दिसते. जिच्या नावाखाली स्वैराचार वाढला. कोपर्डीसारखा बलात्कारासमान अनेक घटना वाढताना शासकीय यंत्रणा प्रसार माध्यम व बिगर शासकीय संघटनांनी गाजावाजा केल्यास दखल घेते. वर्तमान भांडवली व बाजाराभिमुख अर्थव्यवस्था नफेखोरी बाजार व व्यावसायिक राजकारणी युगात राज्यघटनेला अपेक्षित व त्यातून व्यक्त होणारा सामाजिक न्याय आर्थिक व ज्ञानाच्या समृध्दतेतूनच मिळवता येतो. सध्या माहिती तंत्रज्ञान व अर्थव्यवस्थेत होणाऱ्या तीव्र बदलामुळे प्रत्येकजण त्यासोबतच पळण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे लोकशाहीरुपी संरक्षण भिंतीत राहून नवभांडवली व्यवस्थेचे हातपाय घट्ट करणारी धोरणे आखावी लागतील. जी सर्वांनाच समान प्रमाणात कोणताही भेदभाव न करता प्रगती व विकासाची समान संधी देतील. संधीच्या समानतेतून सामाजिक न्यायाच्या दिशेने जाणारा राज्यघटनेचा आवाज बुलंद करण्यासाठी सर्व घटकांनी ‘सबका साथ सबका विकासाचे’ धोरण राबवावे. तरच संविधानातील सामाजिक न्यायरुपी अच्छे दिन येतील.

## संदर्भ सूची

१) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय : संपादक-डॉ.एस.डी.साळुंके-२०१६.

२) डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना-डॉ.रावसाहेब कसबे-सुगावा प्रकाशन, पुणे-२०१०

३) गांधी, नेहरु, अम्बेडकर-सामाजिक न्याय एवं राजनीति-कान्ता मीणा हेमराज मीणा - आदि पब्लिकेशन्स, जयपूर-२०११

४) The constitution of India-A Politico-Legal study-J.C.Johari Sterling Publishers private limited-१९९५.

५) भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला-ग्रॅनव्हिल ऑस्टीन-अनुवाद-भारतीय केळकर-डायमंड पब्लिकेशनस-पुणे-२०१३.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded